NEED 24 NEWS
DIGITAL E-PAPER
हर खबर, हर शहर

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577
GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT
UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714
www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में — सच की आवाज़ — जन-जन की आवाज़ — निडर पत्रकारिता



## प्राथमिक आरोग्य केंद्र कजगाव येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न



### सेवा संकल्प सप्ताह व श्री गणेशा आरोग्याचा अभियानांतर्गत

**Vilas Patil।** प्राथमिक आरोग्य केंद्र कजगांव येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न सेवा संकल्प सप्ताह व श्री गणेशा आरोग्याचा अभियानांतर्गत आज प्राथमिक आरोग्य केंद्र कजगाव ता. भडगाव येथे भव्य रक्तदान शिबिर व राष्ट्रीय कुटंब कल्याण कॅम्प संपन्न झाले.सदर रक्तदान शिबिराचे आयोजन भडगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ.समाधान वाघ,प्राथमिक आरोग्य केंद्र कजगांव वैद्यकीय अधिकारी डॉ.दिप्ती मगर डॉ. प्रियंका पाटील डॉ श्रीकांत मराठे आरोग्य निरीक्षक व अजित राजगुडे आरोग्य निरीक्षक व उमेश महाजन औषधं निर्माण अधीकारी यांच्या सूचनेनुसार करण्यात आले.जळगाव येथील रेडप्लस ब्लड सेंटर यांच्या माध्यमातून हे शिबिर घेण्यात आले.सदर प्रसंगी आलेल्या मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन झाले.आलेल्या सर्व म...

## धनाजी दळवी यांनी मांडले शेतकरी व सहकारितेचे विविध प्रश्न.



### धनाजी दळवी यांनी मांडले शेतकरी व सहकारितेचे विविध प्रश्न.

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** धनाजी दळवी यांनी मांडले शेतकरी व सहकारितेचे विविध प्रश्नमुरबाड जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले, तालुका प्रतिनिधी मुरबाड दिनांक १७/०९/२०२६:ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या वार्षिक सभेत मुरबाड तालुक्यातील सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व धनाजी दळवी यांनी शेतकरी, सहकारी संस्था, तरुण, विद्यार्थी, शिक्षक आणि बँक कर्मचारी यांच्या हिताचे विविध महत्त्वपूर्ण प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडले.वार्षिक सर्वसाधारण सभा ही केवळ आर्थिक अहवाल मंजूर करण्यापुरती मर्यादित नसून, ती संस्थेच्या भविष्यातील ध्येयधोरणांना दिशा देणारे महत्त्वाचे व्यासपीठ असते. याद्वारे बँकेच्या कामकाजात पारदर्शक...

## रायते पूल अपघातातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाखांची शासकीय मदत जाहीर.



**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** रायते पूल अपघातातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाखांची शासकीय मदत जाहीरनीड २४ न्यूजजिल्हा प्रतिनिधी: काशिनाथ देसले, ठाणे.तालुका प्रतिनिधी: किशोर पवार. दिनांक: १७ सप्टेंबर २०२६मुरबाड:कल्याण तालुक्यातील रायते पुलावर झालेल्या भीषण रस्ते अपघातातील मृतांच्या वारसांना शासनाकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. या संदर्भातील अधिकृत माहिती नुकतीच प्रशासनाकडून देण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, रायते पुलावर ईको गाडी आणि मिक्सर डंपर यांच्यात झालेल्या अत्यंत भीषण अपघातात ११ जणांचा जागीच मृत्यू झाला होता. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण मुरबाड आणि कल्याण तालुक्यात मोठी हळहळ व्यक्त केली जात होती. घटनेची माहिती मिळताच मु...

## केंद्र सरकारचे स्पष्टीकरण, सामान्य नागरिकांना आणि लहान व्यापाऱ्यांना मोठा दिलासा





**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** केंद्र सरकारचे स्पष्टीकरण, सामान्य नागरिकांना आणि लहान व्यापाऱ्यांना मोठा दिलासा नवी दिल्ली: युनिफाइड पेमेंट इंटरफेस अर्थात युपीआय (UPI) द्वारे होणाऱ्या लहान व्यवहारांवर कोणतेही बँक शुल्क आकारले जाणार नाही, असे केंद्र सरकारने आता पूर्णपणे स्पष्ट केले आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडिया आणि विविध माध्यमांवर युपीआय व्यवहारांवर अतिरिक्त शुल्क आकारले जाणार असल्याच्या जोरदार चर्चा आणि अफवा सुरू होत्या. या सर्व अफवांवर आता सरकारने पूर्णविराम लावला आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, २,००० रुपयांपर्यंतच्या ऑनलाईन व्यवहारांवर कोणताही अतिरिक्त कर किंवा शुल्क लागू होणार नाही. डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी आणि पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी स...

## माननीय कार्य सम्राट आमदार श्री किसनजी कथोरे यांना मुरबाड विधानसभा मतदार व कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा


**Kashinath Dhondu Desale।** मुरबाड विधानसभा क्षेत्रातील मतदार व कार्यकर्त्यांनी माननीय कार्य सम्राट आमदार श्री किसनजी कथोरे यांना विशेष शुभेच्छा अर्पण केल्या. या कार्यक्रमात विविध वयोगटातील पक्षसदस्य, स्थानिक नेते कार्य कर्ते आणि सामान्य नागरिक सर्व विभागाचे अधिकारी सर्व पत्र कार बांधव सहभागी झाले. समारंभात उपस्थित सर्वांनी आमदारांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व आगामी विकास कार्यांसाठी समर्थनाची घोषणा केली. उपस्थितांनी आमदारांच्या कार्यक्षमतेबद्दल आणि क्षेत्रातील सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल प्रशंसा केली. या भेटीचा उद्देश मतदारांशी थेट संवाद साधणे व त्यांच्या अपेक्षा व समस्या समजून घेणे हा होता. कार्य सम्राट आमदार यांनी भविष्यातील योजना व...

## अवैध वाळू उपशावर महसूल ची धडक

**Vilas Patil।** गिरणा नदीपात्रात अवैध वाळू उपशावर महसूलची धडक कारवाई; 29 वाहने जप्त,3कोटी ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त विलास पाटील दिनांक 18रोजी पाचोरा तालुक्यातील कुरंगी येथील गिरणा नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर महसूल विभागाने आज पहाटे धडक कारवाई केली. पहाटे पाच वाजताच्या सुमारास करण्यात आलेल्या या कारवाईत अवैध वाळू वाहतूक करणारी 29 वाहने जागीच जप्त करण्यात आली असून सुमारे 3 कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गिरणा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची गुप्त माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार वाळू चोरी व अवैध रेती परिवहन नियमांनुसार ही कारवाई करण्यात आली. जप्त केलेल्या वाहनांचा पंचनामा करण्यात...




## ठाणे जिल्ह्यात २९ सप्टेंबरला रोजगार महाकुंभ; बेरोजगार युवक-युवतींना थेट नोकरीच्या संधी




**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** ठाणे जिल्ह्यात २९ सप्टेंबर २०२६ रोजी बेरोजगार युवक-युवतींसाठी रोजगार महाकुंभ आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम जिल्ह्यातील नोकरी शोधणाऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. विविध नामांकित कंपन्या या मेळाव्यात सहभागी होतील आणि विविध क्षेत्रातील रिक्त पदांसाठी उमेदवारांची निवड प्रक्रिया थेट करणार आहेत. यामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांना थेट रोजगाराची संधी मिळेल. सहभागी उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड, बायोडाटा व इतर आवश्यक प्रमाणपत्रे सोबत आणावीत, असे आयोजकांचे आवाहन आहे. दस्तऐवजांची पूर्तता झाल्यास उमेदवारांना नोकरीच्या मुलाखतीसाठी प्राथमिकता दिली जाईल. ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगार तरुणांसाठी हा महाकुंभ रोजगाराच्या दृष्टीने महत्...

## कार्यसम्राट आमदार किसनजी कथोरे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा




**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** कार्यसम्राट आमदार किसनजी कथोरे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा नीड २४न्युज जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले ठाणे. तालुका रिपोर्टर किशोर पवार मुरबाड(.मुरबाड :):दिनांक १९/०९/२०२६.कार्यसम्राट आमदार किसनजी कथोरे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी आणि अनोख्या पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच नागरिकांनी आमदार कथोरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आमदार किसनजी कथोरे यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यकर्त्...




## मुरबाड तालुक्यासह संपूर्ण ग्रामीण भागात ७ दिवसांच्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप; भक्ती भावाने विसर्जन.



��गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या ���

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** NEED 24 NEWS | महा-अपडेटमुरबाड तालुक्यासह संपूर्ण ग्रामीण भागात ७ दिवसांच्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप; विसर्जन मिरवणुकांमध्ये भक्तांचा अथांग जलोष!मुरबाड (विशेष प्रतिनिधी):गत १४ सप्टेंबर २०२६ रोजी अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात आगमन झालेल्या लाडक्या गणरायाला ७ दिवसांच्या भावपूर्ण मुक्कामानंतर मुरबाड तालुक्यासह संपूर्ण ग्रामीण भागात अत्यंत भावूक वातावरणात निरोप देण्यात आला. "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!" अशा आर्त हाका मारत आणि ढोल-ताशांच्या गजरात भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जन केले.ग्रामीण भागात पारंपरिक संस्कृतीचा अनोखा जल्लोषमुरबाड शहरासोबतच तालुक्यातील संपूर्ण ग्रामीण भागात ७ व्या दिवशी घरगुती आणि काही सार्वजनिक...

## महाराष्ट्र में १७ सितंबर को मनाया गया मराठवाड़ा मुक्ति संग्राम दिवस



**Imran BELIM।** मराठवाड़ा मुक्ति संग्राम दिवस, जिसे मराठवाड़ा लिबरेशन डे भी कहा जाता है, प्रत्येक वर्ष १७ सितंबर को महाराष्ट्र राज्य में बड़े उत्साह के साथ मनाया जाता है। यह दिन मराठवाड़ा क्षेत्र की स्वतंत्रता संग्राम की स्मृति में आयोजित किया जाता है। इस अवसर पर राज्य के विभिन्न हिस्सों में विभिन्न कार्यक्रमों के माध्यम से मनाया जाता है, जहाँ नागरिक और सरकारी प्रतिनिधि इतिहासिक घटनाओं को याद करते हैं और क्षेत्र की सांस्कृतिक धरोहर को सुदृढ़ करने का संकल्प लेते हैं। मराठवाड़ा लिबरेशन डे के तहत स्कूल, कॉलेज और सार्वजनिक संस्थानों में विशेष सभाएँ, व्याख्यान और स्मृति समारोह आयोजित किए जाते हैं, जिससे नई पीढ़ी को इस संघर्ष की महत्ता का बोध हो सके।

## साखरपा बसस्थानकावर २.६५ लाखांच्या दागिन्यांची चोरी




**Aniket Mestri।** १६ सप्टेंबर रोजी सकाळी साखरपा बसस्थानकावर बसमध्ये चढताना अज्ञात चोरट्याने विनिता विकास अवसरे (वय ४८, गृहिणी) यांच्या पर्समधील छोट्या पाकिटातून सोन्याचे मंगळसूत्र व अंगठी अशा तब्बल २.६५ लाखांच्या दागिन्यांची चोरी केली. विनिता अवसरे सध्या रा. परळ, मुंबई येथे राहतात आणि मूळ रा. प्रभानवल्ली, वाणेवाडी, ता. लांजा येथील आहेत. त्या आपल्या पतीसह अंत्रवली, ता. संगमेश्वर येथे जाण्यासाठी साखरपा बसस्थानकात आल्या होत्या. कोल्हापूर ते संगमेश्वरमार्गे चिपळूण जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने त्यांच्या पर्समधील छोट्या पाकिटावर डल्ला मारला. चोरट्याने अंदाजे पाच तोळे वजनाचे, सुमारे २ लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि सुमार...

## मुंबई कोस्टल रोडवर बीएमडब्ल्यू कार फ्लायओव्हरवरून पडली, अहमदाबादच्या २ विद्यार्थ्यांचा मृत्यू, १ गंभीर



**Kalpeshkumar Narayanbhai Panchal, मुंबई।** मुंबईच्या कोस्टल रोडवर पहाटे ५:३० वाजता, मरीन ड्राईव्ह ते हाजी अलीकडे जाणारी भरधाव बीएमडब्ल्यू कार लोटस जेटीजवळच्या फ्लायओव्हरवरून थेट खाली कोसळली. या अपघाताचे थेट दृश्य सोशल मीडियावर प्रसारित झाले. कार चालवणारे २१ वर्षीय सनाय गज्जल आणि १७ वर्षीय धैर्य शेट, दोघेही अहमदाबादचे विद्यार्थी, अपघाताच्या ठिकाणीच मरण पावले. ते एनएमआयएमएस, मुंबईमध्ये शिक्षण घेत होते. २० वर्षीय उन्मय ओसवाल, आणखी एक विद्यार्थी, गंभीर स्थितीत नायर रुग्णालयात दाखल आहे आणि सध्या अतिदक्षता विभागात उपचार घेत आहे. मुंबई पोलिसांनी कुटुंबीयांना माहिती दिली असून घटनास्थळी फॉरेन्सिक तपास सुरू केला आहे. तपासात कारचा वेग, मार्गाची सुरक्षा आणि इतर कारणांचे मूल्यांकन केले जाईल.

## 'विकासाचा नवा पॅटर्न' वाढदिवस विशेषांकाचे आमदार किसनजी कथोरे यांच्या हस्ते शानदार प्रकाशन.

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** 'विकासाचा नवा पॅटर्न' वाढदिवस विशेषांकाचे आमदार किसनजी कथोरे यांच्या हस्ते शानदार प्रकाशन!मुरबाड (ठाणे):तालुक्यात झालेल्या अभूतपूर्व विकासकामांचा वेध घेणाऱ्या आणि पत्रकार शंकर करडे यांच्या लेखणीतून साकारलेल्या 'विकासाचा नवा पॅटर्न' वाढदिवस विशेषांक २०२६ चे आज २० सप्टेंबर २०२६ रोजी आमदार श्री किसनजी कथोरे यांच्या हस्ते भव्य प्रकाशन करण्यात आले.आमदार किसनजी कथोरे यांनी मुरबाड तालुक्यात राबवलेल्या विविध विकासकामांची आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांची सविस्तर माहिती या विशेषांकाच्या माध्यमातून जनतेसमोर आणण्यात आली आहे. सर्व प्रमुख मान्यवर, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.या जाहीर कार्यक्रमाला ताल...

## रायगडच्या म्हसळ्यात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर पाच जणांकडून वारंवार अत्याचार; दोन आरोपी अल्पवयीन

**Aniket Mestri।** रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातून एक अत्यंत संतापजनक आणि हादरवणारी घटना समोर आली आहे. येथे एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर पाच जणांकडून वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीनुसार, तिच्या ओळखीच्या तरुणांनी तिला विविध प्रकारे फसवून आणि धमकावून हे अकृत्य केले आहे. याशिवाय, एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत पीडितेच्या घरी सुरू असलेल्या बांधकामाचा गैरफायदा घेत, एका ४० वर्षीय मिस्त्रीने घरात कोणी नसताना बळजबरीने घरात शिरून तिच्यावर अत्याचार केल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी म्हसळा पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पाचह...




## पुण्यात 'आमदार' लोगो लावलेल्या मोटारींवर पिंपरी-चिंचवड पोलिसांची कारवाई; परवाना निलंबनाची तयारी




**Aniket Mestri।** पिंपरी-चिंचवड पोलिसांनी १७ सप्टेंबर २०२६ रोजी पुण्यात 'आमदार' आणि अशोकस्तंभ लोगो लावलेल्या मोटारींवर कारवाई केली. कस्पटे वस्ती, वाकड येथे तपासणीदरम्यान काळ्या काचेची मोटार सापडली, ज्यावर पांढरी-हिरवी अशोकस्तंभ आणि 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य-आमदार' असा बनावट लोगो लावलेला होता. या प्रकरणात पिंपळे सौदागर आणि भोसरी येथील व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले. पोलीस शिपाई सुधीर कैलास साबळे यांनी वाकड ठाण्यात फिर्याद दिली असून, संबंधित वाहन चालक-मालकांचे वाहन परवाने निलंबित करण्यासाठी परिवहन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.

## धुळे पोलिस ॲक्शन मोडवर; १० तलवारीसह ५.३० लाखांचा मुद्देमाल जप्त...!!





**Maheshprasad Dixit।** विभागीय प्रतिनिधी गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; शहरातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी अशा कारवाया सुरूच राहणार - पोलीस प्रशासन धुळे, दि. १८ - धुळे शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. याचाच एक भाग म्हणून स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) मोठी कारवाई करत १० घातक तलवारींसह सुमारे ५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोन संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे. काय आहे प्रकरण? स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली होती की, काही इसम बेकायदेशीररित्या धारदार शस्त्रांची वाहतूक करत आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून कारवाई केली. यावेळी संशयितांकडून १०...

## गौताळा अभयारण्यात वृक्षतस्करीवर वन विभागाचा दणका; ६१ अवैध बल्ल्या जप्त, तिघांना बेड्या.....

**Maheshprasad Dixit।** विभागीय प्रतिनिधी चाळीसगाव वनपरिक्षेत्रात ट्रॅक्टर-ट्रॉलीसह मुद्देमाल जप्त; न्यायालयाकडून ३ दिवसांची वन कोठडी चाळीसगाव, दि. १७ - गौताळा अभयारण्याच्या चाळीसगाव वनपरिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध वृक्षतोड आणि लाकूड तस्करीच्या प्रकाराला वन विभाग आणि Crime & Corruption Control Association (CCCA) च्या संयुक्त पथकाने चाप लावला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पाच दिवस सखोल पाळत ठेवून करण्यात आलेल्या या धडक कारवाईत ६१ लाकडी बल्ल्या जप्त करण्यात आल्या असून, तिघा तस्करांना ताब्यात घेण्यात आले आहे. वन विभागाला गौताळा अभयारण्यात जिवंत झाडांची कत्तल करून सागवान व अंजन लाकडाची तस्करी होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे CCCA च्या पथकान...

## कामात हलगर्जीपणा करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर होणार शिस्तभंगविषयक कारवाई.



**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** कामात हलगर्जीपणा करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर होणार शिस्तभंगविषयक कारवाई; राज्य शासनाचे परिपत्रक जारीमुंबई:शासकीय कार्यालयांमध्ये सर्वसामान्यांचे अर्ज, निवेदने आणि शासकीय कामे विहित कालमर्यादेत पूर्ण न करता ती जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आता थेट शिस्तभंगविषयक कारवाईची कुऱ्हाड कोसळणा र आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने ११ सप्टेंबर २०२६ रोजी एक महत्त्वपूर्ण शासन परिपत्रक जारी करून सर्व विभागांना याचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.कायद्याचे उल्लंघन केल्यास कारवाई'महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५' (Delay in Disch...

## ज्येष्ठ पत्रकार अरुण जाधव यांचे निधन

**Aniket Mestri।** ज्येष्ठ पत्रकार अरुण दा. जाधव यांचे गुरुवार (दि.१७) सकाळी घरी प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झाले, पोलादपूर तालुका मध्ये शोककळा पसरली आहे. त्यांनी पोलादपूर तालुका मध्ये शैक्षणिक क्षेत्रात रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या देवळे हायस्कूलमध्ये काही वर्षे नोकरी केली, त्यानंतर सहकारी क्षेत्रातील दूध उत्पादक संघ, शेतकरी बाजार, जिजामाता को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्था, नवयुग विद्यापीठ, महाड पोलादपूर तालुका पत्रकार संघ इत्यादी संस्थांमध्ये कार्य केले, समाजातील विविध घटकांशी संपर्क ठेवला. दैनंदिन कुलाबा शिवतेज वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक म्हणून १५ वर्षांहून अधिक काळ पत्रकारिता करताना, त्यांनी रपेट, चौफेर स्तंभलेखन व अग्रल...

## हर्णे किनाऱ्यावर दोन इंडो-पॅसिफिक फिनलेस पॉर्पोईज मृतावस्थेत सापडले




**Aniket Mestri।** दापोली, महाराष्ट्र – हर्णे किनाऱ्यावर एकाच दिवशी दोन इंडो-पॅसिफिक फिनलेस पॉर्पोईज मृतावस्थेत सापडले, ज्यामुळे सागरी पर्यावरण आणि जीवप्रेमींची चिंता वाढली आहे. पहिला नर प्राणी एम.एम. फिशरीजसमोर आढळला, तर दुसरा लहान पिल्लू हर्णे बायपाससमोरील समुद्रकिनाऱ्यावर सापडला. हर्णे कांदळवन विभागाचे प्रमुख फहद जमादार यांनी हा प्रकार प्रथम नोंदवला आणि तत्काळ वनविभागाला सूचित केले. वनविभागातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मुकुंद लोंढे यांनी शवविच्छेदन केले. मृत्यूचे कारण सुमारे आठ ते दहा दिवसांपूर्वीचे असल्याचा संशय असून, धक्क्याने किंवा जाळ्यात अडकल्याने झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, परंतु शवविच्छेदनानंतरही निश्चित कारण ठरवत...





## सावर्डे-कासारवाडी: पतीने पत्नीला दांडक्याने मारहाण व पेट्रोल जाळण्याची धमकी दिली



**सावर्डे-कासारवाडी येथे पती उभयचंद मोहिरे यांनी २५ हजार रुपये मागणी नाकारल्यावर पत्नी पल्लवी मोहिरे यांना दांडक...**

**Aniket Mestri।** सावर्डे-कासारवाडी येथे १५ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी सुमारे २ वाजता पती उभयचंद मोहिरे यांनी त्यांच्या पत्नी पल्लवी मोहिरे यांना २५ हजार रुपये मागणी नाकारल्यावर शिवीगाळ व दांडक्याने मारहाण केली. पतीने 'तुला मारून टाकेन, पेट्रोल टाकून जाळून टाकेन' अशी धमकी दिली. त्यानंतर पतीने पल्लवी यांच्या कानाखाली व डोक्यावर थापट मारली व लाकडी दांडक्याने डाव्या कुशी व उजव्या पायाच्या ढोपरावर मारहाण केली, ज्यामुळे पत्नी जखमी झाली. पल्लवी मोहिरे यांनी १६ सप्टेंबर रोजी रात्री १०.२१ वाजता सावर्डे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५२ व ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सावर्डे पोलीस करत...

## चाळीसगावात पोलिसांची मोठी कारवाई; १७ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त, दोघे ताब्यात




**Maheshprasad Dixit।** विभागीय प्रतिनिधी चाळीसगाव : प्रतिबंधित गुटखा तस्करीविरोधात चाळीसगाव पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. शहर पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये तब्बल १६ लाख ९९ हजार ८९८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. पहिली कारवाई चाळीसगाव शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. प्रभारी अधिकारी अमितकुमार फटके यांच्या पथकाला हिरापूर रोड परिसरात अवैध गुटखा साठा असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार टाकलेल्या छाप्यात निखिलेश सुनील केवळे (रा. हिरापूर रोड, चाळीसगाव) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित पानमसाला, गुटखा आणि तंब...

---

### मुंबई में गणेश उत्सव के बच्चों की प्रतियोगिता में छोटी बच्ची बनी विजेता



**रमेश कुमार, मुंबई।** मुंबई, महाराष्ट्र में गणेश उत्सव के दौरान आयोजित बच्चों की सांस्कृतिक प्रतियोगिता में कई छोटे-छोटे प्रतिभागियों ने भाग लिया। प्रतियोगिता में विभिन्न आयु वर्ग के बच्चों ने नृत्य, संगीत और कला के माध्यम से अपने कौशल का प्रदर्शन किया। अंत में एक छोटी बच्ची ने अपने उत्साहपूर्ण प्रस्तुति से सभी को प्रभावित कर प्रथम स्थान प्राप्त किया। आयोजकों ने विजेता को सम्मानित किया और सभी प्रतिभागियों को उनके प्रयासों के लिए सराहना व्यक्त की।

### माहिती अधिकाराचा अवमान; मुक्ताईनगरच्या सारोळ्यात ग्रामसेवककाकडून अर्जदाराचा फोन ब्लॉक....




**Maheshprasad Dixit।** माहिती अधिकाराचा अवमान; मुक्ताईनगरच्या सारोळ्यात ग्रामसेवककाकडून अर्जदाराचा फोन ब्लॉक.... विभागीय प्रतिनिधी मुक्ताईनगर (प्रतिनिधी) - मुक्ताईनगर तालुक्यातील सारोळा ग्रामपंचायतीच्या कारभारात मोठा गैरप्रकार समोर आला आहे. माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागणाऱ्या अर्जदाराला माहिती देण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे देत त्याचा मोबाईल नंबरच ब्लॅकलिस्टमध्ये टाकल्याचा धक्कादायक आरोप झाला आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या पारदर्शकतेवरच गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नेमकं प्रकरण काय? पंकज बारसू तायडे असे माहिती मागणाऱ्या अर्जदाराचे नाव आहे. त्यांनी सारोळा ग्रामपंचायतीने गेल्या पाच वर्षात केलेल्या विविध विकासकामांची माहिती मिळावी यासाठी माहिती अधिक...

### गणेश उत्सवानिमित्त ओतूर मार्केटमध्ये समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे कीर्तन

**Ashok durgude, पुणे।** अखिल कृषी उत्पन्न बाजार गणेश मंडळ मार्केट यार्ड ओतूर या ठिकाणी गणेशोत्सवानिमित्त समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे कीर्तन झाले, कीर्तनातून महाराजांनी काही सूचना केल्या त्यामध्ये पहिली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टिकल्या पाहिजे दुसरी गावाची प्रगती राजकारण विरहित झाली पाहिजे तरुण मुलांना मोबाईलचा वापर कमी केला पाहिजे व ठराविक काळामध्ये लोकांनी परमार्थ कडे वळली पाहिजे अशा अनेक उदाहरणे देत लोकांना समाज प्रबोधन महाराजांनी केले चालू जीवनावर दाखले देत महाराजांनी लोकांना हसवले या कार्यक्रमासाठी जुन्नर तालुक्याचे आमदार श्री शरद सोनवणे व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री प्रकाश नाना ताजणे. श्री तुषार भाऊ थोरात. सौ. प्रियंका ताई...

### शेकडो दिव्यांग बांधवांचे अनुदान रखडले, तहसीलदारांना निवेदन

**Maheshprasad Dixit।** विभागीय प्रतिनिधी आठ दिवसांत न्यायाचे आश्वासन तहसीलदार म्हणाले - कोणाचेही अनुदान थांबणार नाही --- बातमी - जामनेर, दि. १७ - जामनेर तहसील कार्यालयात आज दिव्यांग बांधवांनी आपल्या विविध मागण्यांसाठी एकत्र येत निवेदन दिले. विश्वशांती दिव्यांग बहुउद्देशीय संस्था, जामनेर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो दिव्यांग बांधव या वेळी उपस्थित होते. दिव्यांग बांधवांचे शासनाकडून मिळणारे मासिक अनुदान गेल्या अनेक महिन्यांपासून थकीत असल्याने दिव्यांग बांधवांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच केवायसी आणि पोर्टल संबंधी येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे अनेकांचे अनुदान बंद झाले आहे. हे अनुदान त्वरित सुरू करावे, या प्रमुख मागणीसाठी हे निवेदन देण्यात आले...